# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharasthra.gov.in


**परिपत्रक**

**क्रमांक:** 10/एडीएम/पदविका/2017/ ३८५४

**दिनांक:** 29 AUG 2017

**विषय:-** **शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी व पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माणशास्त्र/ सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी/ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थामध्ये संस्थास्तरावर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत...**

**संदर्भ:-**
1. **मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्रमांक** No.: CETCELL/Post HSC Diploma/Notice/2017/**591 dated 29.06.2017.**
2. **मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्रमांक** No.: CETCELL/Direct Second Year Diploma/Notice/2017/567 dated 22.6.2017.
3. **संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : 10/एडीएम/पदविका/2017/3678, दिनांक 7.7.2017 व परिपत्रक क्रमांक : 10/एडीएम/पदविका/2017/3679, दिनांक 10.7.2017.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन सूचनेच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये इयत्ता बारावी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरिक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळमार्फत घेण्यात आली होती. सदर फेरपरिक्षेचा निकाल जाहिर झालेला आहे. सदरच्या फेरपरिक्षेत उत्तीर्ण झालेले उमेदवार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या पदविका प्रवेश प्रक्रियेत भाग घेण्यास इच्छुक असल्यास अशा उमेदवारांना प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले रजिस्ट्रेशन करण्यास व तद्नंतर थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी व पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माणशास्त्र/ सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी/ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमातील विनाअनुदानित संस्थांमध्ये संस्थास्तरावर प्रवेश घेण्यास उमेदवारांच्या शैक्षणिक हितास्तव खालीलप्रमाणे एक संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**For Direct Second Year Post SSC Diploma Engineering :-**

Online Registration & Documents verification, confirmation of Application Form for Admission to Seats other than CAP Seats shall be continued till **30st August2017** up to 5.00 PM at FCs. Applications registered online/verified & confirmed at FC after Last Date i.e. 11th July 2017 shall be considered only for Non CAP Seats

**For Post HSC Diploma in Phamacy/ Surface Coating Technology/ H.M.C.T. :-**

Online Registration & Documents verification, confirmation of Application Form for Admission to Seats other than CAP Seats shall be continued till **30st August2017** up to 5.00 PM at FCs. Applications registered online/verified & confirmed at FC after Last Date i.e. 13th July 2017 shall be considered only for Non CAP Seats

तसेच थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी व पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माणशास्त्र/ सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी/ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमातील केंद्रिभूत प्रवेश प्रकियेकरिता दि. २४.०८.२०१७ पर्यंत ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेले नाहीत व आता प्रवेश प्रकियेत सहभाग घेण्यास इच्छुक आहेत, असे उमेदवारही संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेऊ शकतात.

वरील नमुद उमेदवारांकडुन संबंधित सुविधा केंद्रानी अर्ज विक्रीची फी रोख स्वरुपात घेऊन यापुर्वी केलेल्या प्रकियेप्रमाणे सदर अर्ज विक्रीची फी सीईटीकडे जमा करावी. तसेच प्रवेश झालेल्या संस्थेने प्रति विद्यार्थी रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) रोख प्रोसेसिंग फी घेण्यात यावी. तद्नंतर आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे नावे (विद्यार्थ्यांच्या Excel मधील इथ्यंभूत माहितीची यादीसह) त्यांचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचेकडे पाठवतील व त्यांची योग्य ती नोंद ठेवुन त्यांची यादी विभागीय कार्यालयामार्फत पडताळणी करुन या संचालनालयास पाठवतील.

तसेच सदर प्रकरणी थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी व पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माणशास्त्र/ सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी/ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमातील विनाअनुदानित संस्थेतील वर नमुद केल्यानुसार प्रवेश घेण्याची संदर्भिय पत्र क्रमांक १ व २ च्या पत्रान्वये नमुद केल्यानुसार विनाअनुदानित संस्थांमधील संस्थास्तरावरील प्रवेशाची अंतिम तारीख (cut off date of admission) दि. ३१.०८.२०१७ पर्यंतच राहील, यांची नोंद संबंधित संस्था/उमेदवार/पालक यांनी घ्यावी.

(चंद्रशेखर ओक ) भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

**प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.**

1. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, बांद्रा (पुर्व), मुंबई
2. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.
3. प्रणाली विश्लेषक, कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई.
4. प्राचार्य, सर्व विनाअनुदानित संस्था
5. प्राचार्य, सर्व सुविधा केंद्र
6. निवडनस्ती.